वर्ष ३४ | सप्टेंबर २०२६ | अंक ९ | ४०५

पॉप्युलर प्रकाशन

# प्रिय रसिक

आपल्यासाठी आणि मित्रांसाठी

३०१, महालक्ष्मी चेंबर्स, २२, भुलाभाई देसाई रोड, मुंबई ४०० ०२६, दूरध्वनी : ०२२ - २३५३०३०३
Email: info@popularprakashan.com / Website: www.popularprakashan.com
/popularprakashan popularprakashan @PopularPrakashn

## अंकविशेष




**हमिदाबाईची कोठी**
अनिल बर्वे







**व्यावसायिक सूत्रांवर आधारित इंग्रजी प्रकाशने**




**Mindful Murmurings**
Dr. Ashutosh Raravikar | Veena Raravikar




**माझ्या सर्वांत लाडक्या नीना**
गेझेचं पत्र




दास्तान-ए-तुर्की
**इस्तंबूल इस्तंबूल**
बुऱ्हान सोनमेझ / अनु. सविता दामले

# अनिल बर्वे

# हमिदाबाईची कोठी

**पत्रकारिता, वैचारिक तसेच ललित साहित्यात आपल्या लेखणीद्वारा मुशाफिरी करणाऱ्या अनिल बर्वे यांनी लिहिलेली बरीच नाटके मराठी रंगभूमीवर सादर झाली. 'हमिदाबाईची कोठी' हे नाटक मात्र रसिकांप्रमाणेच समीक्षकांनीही उचलून धरलं.**

**पंचेचाळीस वर्षांपूर्वी लिहिलेली ही नाट्यसंहिता आता बऱ्याच कालावधीनंतर सर्व नाट्यरसिकांकरिता पुन्हा उपलब्ध झाली आहे.**

**हमिदाबाईची कोठी**... हे नाटक आहे हमिदाबाईचं.. सत्तार-सईदाचं.. शब्बोचं.. आणि अगदी बाहरवाला-बाबूजी, पंटर-लुक्काचंही. पण तितकंच किंबहुना त्याहूनही अंमळ जास्तीच हे नाटक आहे ते या कोठीचं.. तिच्यातल्या रुसव्या-फुगव्याचं, हेवेदाव्याचं, उत्कट प्रेमाचं, कचखाऊ माघारीचं, असहायतेचं, स्वार्थाचं, विखारी विकृतीचं.. अशा कैक भावविश्वांचं.. आणि त्या सगळ्याला छेद देत, सर्वांच्या पार असलेल्या, तिच्यात वसणाऱ्या आर्त सुरांचं.

हे सूर या कोठीची सारी नाम-अनाम दुःखे आळवत अखेर मौन होतात आणि सुरू होते कोठीचे विफल, बदसूर जिणे. सुरू होतो या पात्रांचा कधी स्वतःशीच उकरून काढलेला अंतर्गत झगडा, कधी आपसांतील संघर्ष, तर कधी एकमेकांच्या पुढ्यात एकमेकांकरिता ठामपणे उभारलेली प्राणांतिक जिद्द...

ह्या साऱ्या भावनिक ओढाताणीचे, विणींचे लागेबांधे लेखक प्रत्येक पात्राद्वारे कधी अलवारपणे गुंफत, तर कधी अट्टाहासाने आवळत नेतो. आणि साकार होते हमिदा, सईदा, सत्तार, शब्बो.. आणि अर्थातच या कोठीची दर्दभरी दास्तान.

ही चारही पात्रे परस्परांशी वेगवेगळ्या कारणांनी, वेगवेगळ्या तऱ्हांनी जिव्हाळलेली. आणि या साऱ्यांचे कोठीशीही तितकेच जिवट संबंध. तेही मनात उसळणाऱ्या लहरींप्रमाणे बदलणारे. म्हणूनच हे संबंध इतके जिवंत असावेत.. आणि त्यातला जिवटपणा हा यातनादायी...

सईदा, हमिदा, सत्तार, शब्बो या चौघांच्याही संवादांत त्यांच्या उसाशांइतकीच दीर्घ घुमणारी ही कोठी...

## सईदा :

*“तवायफच्या कोठीवर यायला पब्लिकला पागल कुत्त्यानं नाही काटलं. रुपया फेकला तर थेटरात बसून दहा गाणी ऐकतं पब्लिक. बादशाह-नवाब गेले तवाच तवायफ मेली. कुठं कुणी बडा सेठ भेटेल या उम्मिदनं चार वर्ष नाचली-गायली तुझ्या कोठीवर. काय फाईदा झाला?”*

***

*“तू पछतायेगी हमदाबाय. सवताच्या हातानं तू कोठी बंद करतेस. राशनसाठी तडपशील. चवन्नीसाठी जान टाकायला लागल तुला. मैं जाती हूँ. कधी बुरा वक्त आला तो पुकार मला. मी जरूर येईल. चार साल या कोठीचं निमक खाल्लंय, निमकहराम नाही व्हायची.”*

## हमीदा :

"कोठीवर चार पैसे कमी भेटतील पण ऐकणारा कोणी दर्दी आला तर झुकून सलाम करेल — सालभर पुरेल एवढी इज्जत देऊन जाईल. रांडेची मात्र जवानी लुटणारं गिऱ्हाईकदेखील तिला इज्जत नाही देत."

***

"माझ्या वक्ताला या पुऱ्या मोहल्ल्यात फक्त कोठ्या होत्या — शामचाला हरेक कोठीत नाचगाना चालायचा... माझ्या डोळ्यासामने कोठ्या खतम झाल्या. राहिले रंडीखाने."

***

"अशी छोटी जान नको करू बेटा. इंतजार कर. समुंदराच्या लाटांना देख शब्बो, समुंदरालाभी पुनवेच्या चांदाचा इंतजार करावा लागतो. जिंदगी म्हणजे इंतजार बेटा... कोणाला रोटीचा इंतजार

करावा लागतो. कोणाला मोहब्बतीचा इंतजार करावा लागतो. कोणाला मौतचा. मी गेले की कोठी वीक, पैसा घे. मोहल्ल्यातून जा... शादी कर... बाबूजीसारख्या माणसाशी. आणि इज्जतनी जग. कोठी चालवताना माझी जान गेली. तुझी जिंदगी बरबाद नको व्हायला."

**सत्तार :**

"हमदाबाय, जमाना बदलला पर तू नाही बदलली... देख हमदाबाय, तुझ्या वक्ताला कोठीवर जो सेठ यायचा तो गाना सुनायला यायचा. आताचा सेठ लोग गाना सुनायला नाही... जवान लौंडीची अदा पहायला येतो."

***

"... शब्बोरानी, तवायफची कोठीय ही. तवायफचा वसूल, तवायफचा धरम बोलतो.. हरेक अंधेरी रात रोशन करायची. हासू बिकायचा. सूर बिकायचा...

शब्बोरानी, या कोठीवरला रडण्याचा बदसूर दुनिया ऐकत नाही. विकतदेखील घेत नाही...”

***

“शब्बोरानी... या रंडीबाजारात कोठीसाठी तुला चांगलं गिऱ्हाईक नाही भेटायचं... हां, पैसा बोलशील.. तो पैसा चांगला भेटेल...”

***

“ये कोठी है ना शब्बोरानी, हमिदाबायची कोठी ये... पाकीच राहू दे... या कोठीच्या सिढीखाली मी माझ्या अम्मीची लोरी ऐकलीय. या कोठीची दिवारे माझ्या अम्मीचा आँचल घेऊन उभ्या राहिल्या जिंदगीत – ये कोठी तो माझा घर होता शब्बोरानी, कितीभी पैसा भेटला तोभी ये कोठीचा दारूखाना, जुव्वाखाना, रंडीखाना नको करू तू...”

**शब्बो :**

“तुम्हाला काय वाटलं तवायफचं सारं आयुष्यच कोठीवर उघडं पडलं असतं? कोठीवर पडलं असतं

ते तवायफचं गाणं... नाचणं... तवायफची सुखदुःखं नाहीत... तिचं आयुष्य नाही...

***

“... घरवालीला कोठी विकू सत्तार?... अरे अम्मीनं फिल्लमची गाणीदेखील म्हटली नाही या कोठीवर. त्या या कोठीवर रांडा ठेवायला देऊ... अल्लानं दिलेलं शरीर बेशरमपणे विकायला देऊ?... कभी नही... कभी नही ! सत्तार, नकोत मला ते लाख रुपये. दोन वेळच्या रोटीएवढे पैसे पुरतील मला. अर्धी किंमत आली या कोठीची तरी चालेल...”

***

“बाबूजी, ही कोठी कवडीमोल किंमतीला कोणाही सभ्य माणसाला विकायला मी तयार होते. पण तुम्ही सभ्य मंडळी भित्री निघालात... आणि इतर कुणा गुंडाला दारूच्या नाहीतर जुगाराच्या अड्ड्यासाठी.. नाहीतर रंडीखाना खोलण्यासाठी ही कोठी विकायची नव्हती मला.”

*"जेव्हा दिलात दर्द पैदा झाला नाही तेव्हा या कोठीवर कोणी गझल गायला नाही. बुढ्या पायांना पायलचा बोझा वाटला तेव्हा या कोठीवर कोणी नाचलं नाही. अशी ही कोठी, स्वतःचं लाजिरवाणं जिणं टाळायला, अनेक दुर्दैवी जिणी पैदा करायला विकून टाकायची? कधी नाही... बेहेत्तर आहे वाईट जिणं स्वतःच्या माथी आलं तरी."*

***

**एका तवायफची कोठी आणि तिला लिंपल्या गेलेल्या सर्व पात्रांची करुण, शोकात्म आणि तितकीच काव्यात्म बखर म्हणजे अनिल बर्वे लिखित हमिदाबाईची कोठी हे नाटक. ही नाट्यसंहिता आता बऱ्याच मोठ्या कालवधीनंतर पुनश्च वाचकांच्या भेटीला आली आहे. पॉप्युलर प्रकाशनाने प्रसिद्ध केलेल्या इतर श्रेष्ठ नाट्यकृतींप्रमाणेच याही नाटकास सर्व नाट्यरसिकांनी भरभरून प्रतिसाद द्यावा.**



हमिदाबाईची कोठी
अनिल बर्वे
हमिदाबाईची कोठी
अनिल बर्वे
किंमत
₹. १८५/-
सोबतचा QR कोड स्कॅन करून ९८६७२४२४०७ या व्हाट्सअ‍ॅप क्रमांकावर पैसे पाठवल्याचा तपशील, आणि पिनकोडसहीत संपूर्ण पत्ता पाठवून पुस्तक खरेदी करता येईल.
ऑनलाईन पुस्तक खरेदीसाठी वेबसाईट
popularprakashan.com
Available on
amazon.in
सर्व विक्रेत्यांकडेही उपलब्ध!

# नवीन प्रकाशने

प्रौढतेकडे झुकत असलेल्या एका तुर्की स्त्रीची अंतर्मुख करणारी, त्याचवेळी भारावणारी एक विलक्षण कथा...

## वेगळी

**आयफर टंक | भाषांतर : ललिता कोल्हारकर**




**किंमत ₹. ४००/-**

सोबतचा QR कोड स्कॅन करून ९८६७२४२४०७ या व्हाट्सअॅप क्रमांकावर पैसे पाठवल्याचा तपशील, आणि पिनकोडसहीत संपूर्ण पत्ता पाठवून पुस्तक खरेदी करता येईल.

ऑनलाईन पुस्तक खरेदीसाठी वेबसाईट popularprakashan.com

Available on amazon.in

स्वप्न आणि सत्य यातला वाढता प्रवास, नकार आणि होकार यामधलं सहजी पार होणारं अंतर, भविष्य आणि भूतकाळ यांच्यातील निसटलेला सांधा, घुसमट आणि इच्छा यांमधील खोल खोल दरी, मैत्री आणि प्रेम यातला अव्यक्त गोंधळ, शील आणि शरीर याबाबत असलेला कायमचा संभ्रम, भूक आणि हाव यातला न कळणारा फरक, अशा या कथांच्या आत दडलेल्या या सगळ्या 'थीम्स' हिनाची संवेदनशीलता आणि निरीक्षणशक्ती, या दोन्हीच्या ताकदीची साक्ष देतात.

# फोटोग्राफ

हिनाकौसर खान




किंमत
₹. २७५/-

सोबतचा QR कोड स्कॅन करून ९८६७२४२४०७ या व्हाट्सॲप क्रमांकावर पैसे पाठवल्याचा तपशील, आणि पिनकोडसहीत संपूर्ण पत्ता पाठवून पुस्तक खरेदी करता येईल.

ऑनलाईन पुस्तक खरेदीसाठी वेबसाईट popularprakashan.com

Available on amazon.in

**सर्व विक्रेत्यांकडेही उपलब्ध!**

## व्यावसायिक सूत्रांवर आधारित

# इंग्रजी प्रकाशने

आपल्या देशातील उच्चशिक्षित तरुणाईमध्ये ‘स्टार्टअप’ हा सध्याचा परवलीचा शब्द झाला आहे. नोकरी करण्यापेक्षा स्वत:चा व्यवसाय सुरू करावा असे अनेकांचे स्वप्न असते. आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक, मानसिक आव्हाने स्वीकारत, नव्या वाटा धुंडाळत उद्योजक होण्याचा हा प्रवास निश्चितच खडतर असतो. यासाठी योग्यवेळी मिळालेले तज्ज्ञ-अनुभवी व्यक्तीचे मार्गदर्शनही मोलाचे ठरते. उद्योजकतेची मानसिकता जाणीवपूर्वक घडवत, आपल्या क्षमता विकसित करत त्यानुसार वाटचाल केल्यास यशाचा परिपूर्ण आनंद घेता येतो. हेच व्यावहारिकदृष्ट्या स्पष्ट करणारी आंतराष्ट्रीय ख्यातीचे व्यवसाय तज्ज्ञ अरूण सेहगल याची **The Mind of an Entrepreneur: Core Traits for Success** आणि **The HappyPreneur** ही पॉप्युलर प्रकाशित पुस्तके.



# *The* MIND *of an* ENTREPRENEUR

*Core Traits for Success*

PROF. ARUN SEHGAL

*Blaze your trail, build with the mind,
lead with the heart, and connect with the
souls—guiding them toward a higher purpose
on your entrepreneurial journey—leaving lasting
footprints in boardrooms*

असा अतिशय प्रेरणादायी विचार ***The Mind of an Entrepreneur: Core Traits for Success*** या पुस्तकाच्या सुरुवातीलाच अरुण सेहगल यांनी उद्धृत केला आहे.

कोणताही कौटुंबिक वारसा नसताना, पहिल्या पिढीतील उद्योजक म्हणून अरुण यांनी एक उल्लेखनीय वाटचाल केली आहे. त्यांनी आव्हानांचा सामना केला, यशाचा आनंद घेतला आणि कठीण प्रसंगांतून महत्त्वाचे धडे गिरवले. या पुस्तकाच्या माध्यमातून त्यांनी आपले हे सर्व अनुभव आणि त्यातून मिळालेली शिकवण अत्यंत उदारपणे व सखोलतेने मांडली आहे.

तुम्ही कुठेही काम करत असलात तरी, दीर्घकालीन यशासाठी 'उद्योजकीय वृत्ती' हा एक अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. हे पुस्तक केवळ नव्याने व्यवसाय सुरू करू इच्छिणाऱ्यांसाठीच नाही, तर ज्यांना उद्योजकीय वृत्तीने जगायचे आणि काम करायचे आहे, अशा प्रत्येकासाठी आहे. हा केवळ एका व्यक्तीचा अनुभव-वृत्तांत नाही, तर प्रत्यक्ष अनुभवांवर आधारित एक व्यावहारिक मार्गदर्शक आहे. श्री. सेहगल यांनी उद्योजकीय मानसिकतेचे सखोल विश्लेषण केले असून, जोखीम पत्करण्याची वृत्ती, चिकाटी, नाविन्य आणि परिस्थितीनुसार जुळवून घेण्याची क्षमता यांसारखे गुण कसे विकसित केले जातात व त्यांचा कसा वापर होतो, हे त्यांनी यात स्पष्ट केले आहे. त्यांचे विचार

केवळ व्यावसायिक रणनीतीबाबतच नव्हे, तर आत्मभान, नेतृत्व आणि उद्योजकतेच्या प्रवासातील माणसांचे महत्त्व यांबाबतही मोलाचे धडे देतात.

हे पुस्तक स्पष्ट, मार्मिक आणि सहज समजण्याजोगे आहे. ते केवळ बाह्य रणनीतींपुरते मर्यादित राहत नाही, तर उद्योजकाच्या आंतरिक प्रवासावर — म्हणजेच दीर्घकालीन यश टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक असलेली मानसिकता, अध्यात्म आणि भावनिक लवचिकता यांच्या भूमिकेवर — प्रकाश टाकते. या विचारांमुळे हे पुस्तक व्यावहारिक आणि अत्यंत व्यक्तिगत अशा दोन्ही स्तरांवर प्रभावी ठरते. दक्षिण कोरियातील Dong Bang FTL या हेल्थकेअर क्षेत्रात काम करणाऱ्या कंपनीचे अध्यक्ष यंग जे चुंग यांनी या पुस्तकाला प्रस्तावना लिहिली आहे.

१९४ पृष्ठसंख्येच्या एकूण १७ प्रकरणांमध्ये विभागलेल्या या पुस्तकात सेहगल यांनी आपला ४० वर्षांहून अधिक काळाचा व्यावसायिक अनुभवांचा ठेवा सूत्रबद्ध, अभ्यासपूर्ण आणि ओघवत्या भाषेत वाचकांसमोर उलगडला आहे.

PROF. ARUN SEHGAL

# The MIND of an ENTREPRENEUR

*Core Traits for Success*




MRP ₹. 395/-

Buy book by scanning the QR code. Send payment details and your full address (with pincode) to
: 9867242407

Below Website for buying book online
popularprakashan.com

Available on amazon.in

**Available at All Bookstores**

The

# HappyPreneur

*Creating abundance*
*without losing*
*what money cannot buy!*

Arun Sehgal | Chhaya Sehgal

*"Happiness is the real wealth. And you are not truly successful until you are deeply, peacefully, joyfully happy. This book is for every entrepreneur who wants to create abundance without loss, success without emptiness, and wealth without regret."*

**The HappyPreneur** या पुस्तकातील वरील ओळीमधून लेखक अरुण सेहगल आणि छाया सेहगल यांनी यशाचे गमक मांडत आजच्या खडतर व्यावहारिक जगात या पुस्तकाची आवश्यकता स्पष्ट केली आहे. एका उद्योजकासाठी खऱ्या आनंदाची निर्मिती कशातून होते — उत्तम आरोग्य, समृद्ध नातेसंबंध, समाजात मिळणारा

आदर, पुरेसा पैसा आणि त्या पैशाचा आनंद घेण्यासाठी आवश्यक वेळ व स्वातंत्र्य अशा विविध विषयांवरील अनेक वर्षांच्या चिंतनाचा परिपाक पुस्तकात मांडला आहे. जे लोक सचोटीने नेतृत्व करू इच्छितात, जाणीवपूर्वक प्रगती करू पाहतात आणि स्वतःचे अस्तित्व न गमावता यशस्वी होऊ इच्छितात, त्यांच्यासाठी हे पुस्तक एक विचारप्रवर्तक मार्गदर्शक आहे. अरुण आणि छाया सेहगल यांनी उद्योजकतेचे एक असे तत्त्वज्ञान मांडले आहे, जे संपत्ती निर्मितीच्या केंद्रस्थानी मानवी मूल्यांना ठेवते.

आजच्या गतिमान आणि अत्यंत स्पर्धात्मक वातावरणात, उद्योजकतेकडे अनेकदा नाविन्य, संपत्ती आणि आमूलाग्र बदल घडवून आणण्याचे साधन म्हणून ग्लॅमरस किंवा आकर्षक दृष्टीकोनातून पाहिले जाते. मात्र, महसूल आणि बाजारपेठेतील हिस्सा यांसारख्या आकडेवारीच्या पलीकडे उद्योजकतेचा एक अधिक सखोल आणि अनेकदा दुर्लक्षित राहिलेला पैलू असतो, जो मूल्ये आणि उद्देशांवर आधारलेला असतो. व्यावसायिक निर्णयांमध्ये शाश्वत

मानवी मूल्यांचा समावेश करून, उद्योजक एक असा मार्ग शोधतात जो समाधानकारक आणि शाश्वत असतो.

या प्रवासाची सुरुवात स्वच्छ अंतःकरणाने जगण्यापासून होते. उद्योजकाचा उद्देश स्पष्ट असणे—म्हणजेच आपण व्यवसाय का आणि कोणासाठी उभारत आहोत हे ठाऊक असणे — हा अस्थिर प्रवासात एका नैतिक आधारस्तंभासारखा काम करतो. दबावाच्या परिस्थितीतही आपल्या ध्येयाशी प्रामाणिक राहण्यास मदत करतो, ज्यामुळे दीर्घकालीन विश्वास आणि भावनिक स्वास्थ्य वृद्धिंगत होते.

प्रचंड स्पर्धेच्या काळात फक्त तग धरू पाहणारे उद्योजक आणि आव्हानांवर मात करून भरभराट करणारे उद्योजक यांच्यातील फरक केवळ कामाच्या अंमलबजावणीवर अवलंबून नसतो, तर सततच्या बदलांच्या काळातही पाय जमिनीवर ठेवणे, मूल्यांची कास धरणे आणि सजग राहणे या क्षमतेवर असतो. **The HappyPreneur** याच वास्तवावर थेट भाष्य करते.

❋❋❋

# The HappyPreneur

*Creating abundance without losing what money cannot buy!*

Arun Sehgal | Chhaya Sehgal




Buy book by scanning the QR code. Send payment details and your full address (with pincode) to : 9867242407

Below Website for buying book online
popularprakashan.com

Available on amazon.in

**Available at All Bookstores**

# Mindful Murmurings

Dr. Ashutosh Raravikar
Veena Raravikar

डॉ. आशुतोष राराविकर आणि वीणा राराविकर यांनी **Mindful Murmurings** या आपल्या पुस्तकातून अतिशय सोप्या शब्दांत जीवनविचार मांडले आहेत. ते आयुष्याकडे पाहण्याचे निरनिराळे दृष्टिकोन वाचकांसमोर ठेवतात.

डॉ. आशुतोष राराविकर हे नामवंत अर्थतज्ज्ञ असून त्यांनी तीन दशकांहून अधिक काळ अर्थशास्त्र क्षेत्रात आपले योगदान दिले आहे. ते सध्या भारतीय रिझर्व्ह बँकेत संचालक म्हणून कार्यरत आहेत. यापूर्वी ते भारत सरकारच्या अर्थ मंत्रालयात संचालकपदी होते. तर, वीणा राराविकर यांनी व्यवसाय व्यवस्थापनातील पदव्युत्तर पदवी तसेच सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी आणि भौतिकशास्त्रातील पदवी प्राप्त केली असून विविध देशांत अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये त्यांनी काम केले आहे.

## या पुस्तकात मांडलेली काही खास विचार-अवतरणे —

*Art of fitness is*
*keeping sorrow in limit and*
*raising joy beyond limit*

*Knowing reality is Wisdom*
*Changing reality is Courage*
*Turning dreams into reality*
*is an Achievement*

*In the equation of life*
*the best solution is derived*
*when happiness*
*is an independent variable*

*Success is measured by*
*how many steps we have climbed upon*
*than on which step we stand*

*Life is a process of*
*replacing the mountain of stress*
*by the fountain of merriness*



ज्येष्ठ सुलेखनकार अच्युत पालव या पुस्तकाविषयी आपल्या मनोगतात म्हणतात —

***'Mindful Murmurings' म्हणजे अनेक मनांना प्रकाशित करणाऱ्या छोट्या, पण सामर्थ्यशाली दीपशिखांचा एक संग्रह आहे. आयुष्याच्या या रंगमंचावर यशस्वी कामगिरी करण्यासाठीची ही एक उपयुक्त अशी संहिता आहे.***

**दसरा-दिवाळीमध्ये आपल्या प्रिय जनांना भेट देण्यासाठी हे पुस्तक एक उत्तम पर्याय ठरू शकते.**

❋❋❋

*Foreword by Achyut Palav, Padma Shri awardee*

# Mindful Murmurings

Dr. Ashutosh Raravikar | Veena Raravikar

**“Perpetual, timeless, and priceless thoughts for the modern times by an eminent duo.”**




MRP ₹. 425/-

Buy book by scanning the QR code. Send payment details and your full address (with pincode) to
: 9867242407

Below Website for buying book online
popularprakashan.com

Available on amazon.in

**Available at All Bookstores**

# माझ्या सर्वांत लाडक्या नीना

*विख्यात तुर्की लेखिका ओया बाय्दोर यांची ज्येष्ठ कादंबरीकार, नाटककार मकरंद साठे यांनी मराठीत भाषांतरित केलेली **तुर्की मांजराकडून आलेली पत्रे** ही कादंबरी नुकतीच प्रसिद्ध झाली. अल्पावधीतच या कादंबरीची पहिली आवृत्ती संपली. ही कादंबरी दहा मांजरींची शोधकथा आहे. आपल्या मालकांना दुःखी करणारे, त्यांना वेदना देणारे एक गुपित आहे, असे त्यांना वाटते—आणि त्या गुपिताचा शोध घेताना त्या एकमेकींना पत्रांद्वारे संदेश पाठवतात. या मांजरींचे मालक १९८० साली तुर्कस्तानात झालेल्या लष्करी उठावानंतर देश सोडून युरोपातील विविध देशांत आश्रय घ्यायला भाग पडलेले लोक आहेत. या मांजरींनी स्थापन केलेल्या “मालकांची गुपिते शोधा” या संघटनेची कारस्थाने आणि पत्रांद्वारे, मांजरींचे स्वतंत्र जीवन, त्यांच्यातील नातेसंबंध, प्रेमप्रकरणे यांचे मजेशीर चित्रण या कादंबरीत केले आहे. या कादंबरीच्या लेखिकेची ‘नीना’ ही मांजर चक्क स्वतः या कादंबरीची एक नायिका आहे. तिला तिच्या लाडक्या मैत्रिणीने — गेझेने पाठवलेलं हे पत्र :*

माझ्या सर्वांत लाडक्या नीना,

तुझे पत्र मिळाले. तुझा विश्वास बसणार नाही पण मला आलेलं ते पहिलं पत्र आहे. उत्तर लिहायला मी अधीर झाले आहे. तू कदाचित ऐकलं असशील की मी काळ्या रंगाची मांजरी आहे आणि त्यामुळेच त्यांनी माझं नाव गेझे (टर्किश भाषेत गेझेचा अर्थ रात्र असा आहे.) असं ठेवलं आहे. माझ्या आत्ताच्या मालकांनी ज्या तरुण मुलाकडून मला विकत घेतलं त्यानं माझं हे नाव ठेवलं होतं. मी ज्या घरात जन्मले ते घर किंवा माझी आई मला आठवत नाहीत. मी खूपच लहान असताना बाहेर पडले किंवा खरं मला तिथून इथे आणलं गेलं. पण माझ्या मनात त्याबद्दल काही आढी किंवा राग नाही. आम्ही पाच भावंडं होतो आणि आमच्या आईचं दूध पिण्यासाठी आम्हाला एकामागोमाग एक असं रांगेनं सोडलं जाई; त्या ऐवजी इथे, या घरात, माझ्या पुढच्या जेवणाबद्दल मला कधीही चिंता करावी लागत नाही.

माझी मालकीण माझ्यावर इतकं प्रेम करते की ती मला जरा जास्तच कवटाळून बसते हे सोडलं तर ती खरंच एक कमालीची चांगली स्त्री आहे असं माझं मत आहे. मी तिच्यावर मनापासून प्रेम करते, अगदी मांजरांना शोभून दिसणार नाही इतकं, त्यामुळे मी तुझ्या मालकांवर जरा नाराज आहे. ते ज्या रात्री इथे राहिले तेव्हा त्यांनी माझ्या मालकिणीला मनस्ताप दिला अशी माझी धारणा झाली आहे. ते काय बोलत होते किंवा खरंतर कशाविषयी भांडत होते ते खरंतर मला कळत नाही, पण ते इथं असताना मला हवेत तणाव जाणवत होता, नकारात्मक कंपनं जाणवत होती आणि त्यांच्यात काही मतभिन्नता किंवा गैरसमज असावेत असं वाटत होतं; अशी मतभिन्नता की ज्यावर उपाय शोधण्याचा प्रयत्न ते करत होते, अगदी तो केल्याशिवाय तरणोपाय नसावा अशाप्रकारे ते सगळेच प्रयत्न करत होते, पण त्याचा काही उपयोग झाला नाही. त्यांच्यातलं अंतर आणि दुरावा कायम राहिला; माझ्या मांजरांच्या

जाणिवांना तो अगदी नीट जाणवत होता. अख्खी रात्र ते विभाजन आणि पडझड किंवा विनाश यांबद्दल बोलत होते. कधी ते रागारागाने बोलत होते तर इतर वेळी ते विषण्ण झाल्यासारखे बोलत होते, कधी ते जोमदारपणे बोलत होते तर इतर वेळी हरल्यासारखे आणि सगळे संपल्याच्या सुरात बोलत होते. तुझी मालकीण एका पडलेल्या भिंतीच्या अवशेषांखाली अडकले जाण्याबद्दल बोलत होती, पण मी तिच्याकडे नीट पाहिलं तर तिची अवस्था तर उत्तम दिसत होती. तिच्या अंगावर कुठेच जखमा किंवा व्रण दिसत नव्हते. माझ्या मालकिणीला सायकलवरून जाताना झालेल्या अपघातामुळे लंगडावं लागत होतं तसंसुद्धा काही तिला करावं लागत नव्हतं. खरं सांगायचं तर माझा तिच्या बोलण्यावर विश्वास बसला नाही, पण माझी मालकीण तिला रागे भरत म्हणाली, ‘ती भिंत बांधणारे आपणच होतो हे विसरू नकोस.’ त्या अर्थी कुठेतरी अशी भिंत होती आणि ती पडली आणि ही भिंत, मग ती कुठे का असेना, त्यांच्यासाठी

महत्त्वाची आहे हे माझ्या लक्षात आलं. मी नक्कीच एक ना एक दिवस या भिंतीचा शोध घेणार आहे आणि हे प्रकरण काय आहे ते समजून घेणार आहे.

मला जे काही लक्षात आलं ते असं की माझी मालकीण आणि तुझे मालक एक काम एकत्रितपणे करत होते पण ती मोठी चूक होती असं कधीतरी त्यांना जाणवलं. निदान माझ्या मालकिणीला तसं वाटतं. ते ज्या कशात सामील होते ते आता भूतकाळ म्हणून सोडून द्यायला हवं असं ती म्हणते, आणि ती त्यात गुंतलेल्या सगळ्यांनाच दोषी धरते; स्वतःला तर सगळ्यात जास्त. या उलट, तुझ्या मालकांचं म्हणणं असं दिसतं की जरी ती चूक असली तरी ते जे काही करू पाहत होते त्यातला चांगलेपणा, नैतिकता ही आजही यथार्थ आहे, वैध आहे आणि या सगळ्याला नाकारण्यातून केवळ अस्मितांबद्दलचे संकट किंवा पेचप्रसंग उभा राहील. अर्थात, हे मी त्यांच्या संवादातून उचलू शकले असे काही तुकडे आहेत. मग ते खूप म्हणजे खूपच वेळ मानवी आयुष्याला

काय अर्थ असतो या विषयी बोलत बसले. आणि या विषयावरही त्यांच्यात प्रचंड मतभिन्नता होती! या चर्चेत, जेव्हा बोलणं तसं मवाळ सुरात चाललं होतं, तेव्हासुद्धा वातावरणात इतका नकारात्मक तणाव होता, रागाचा एक इतका धोकादायक प्रवाह होता की ते एकमेकांविरुद्ध कायमचं शत्रुत्व जाहीर करतील आणि परत एकमेकांचं तोंडही पाहणार नाहीत असं मला वाटून गेलं; पण दुसऱ्या दिवशी जेव्हा तुझी मंडळी जायला निघाली तेव्हा सगळ्यांनी एकमेकांना बऱ्यापैकी प्रेमानं मिठ्या मारल्या. त्यांच्यातलं नातं जरा चमत्कारिक आहे. सयामी जुळी - जी एकमेकांना जोडली गेलेली असतात - त्यांना दोन वेगवेगळ्या दिशांना जायचं असावं पण त्यांना तसं करता येत नाही, तसं काहीतरी ते आहे. मला एक गोष्ट कळली आहे आणि ती ही की हे मानव खूप विचार करतात आणि खूप बोलतात; याच्या उलट शब्द जपून आणि संयमानं वापरले पाहिजेत, ते जेवढ्या जास्त प्रमाणात वापरले

जातील तेवढ्या प्रमाणात आपल्यातले भावनिक बंध सैल पडतात आणि जवळीक कमजोर होते ते आपल्यासारख्या मांजरांना ठाऊक आहे. हवेत विहरणाऱ्या भावना आणि आपल्या कानांच्या आणि मिशांच्या टोकांना जाणवणारे त्याचे अनुनाद फार महत्त्वाचे असतात हे आपल्याला माहीत आहे.

कृपया माझ्या पत्राला उत्तर पाठव. मला तुझे विचार ऐकायला आणि तुझ्या अनुभवापासून शिकायला आवडेल. आणि 'मार्क्स' आणि 'लेनिन' यांच्याविषयी जास्त कळून घ्यायला खूपच आवडेल. मी हे दोन शब्द इतक्यांदा ऐकले आहेत की मी आता त्यांच्याबद्दलच्या कुतूहलाने मरायला टेकले आहे!

**तुझी बहीण,**
**गेझे**

❊❊❊

# तुकी मांजराकडून आलेली पत्रे

**ओया बाय्दोर**

**भाषांतर : मकरंद साठे**




किंमत
₹. ४५०/-

सोबतचा QR कोड स्कॅन करून ९८६७२४२४०७ या व्हाट्सॲप क्रमांकावर पैसे पाठवल्याचा तपशील, आणि पिनकोडसहीत संपूर्ण पत्ता पाठवून पुस्तक खरेदी करता येईल.

ऑनलाईन पुस्तक खरेदीसाठी वेबसाईट
popularprakashan.com

Available on amazon.in

## सर्व विक्रेत्यांकडेही उपलब्ध!

# दास्तान-ए-तुर्की

'पॉप्युलर प्रकाशन' हे मागील काही वर्षांपासून उत्तमोत्तम निवडक तुर्की साहित्याचा आणि त्यातही मुख्यत्वे तुर्की कादंबऱ्यांचा मराठी अनुवाद वाचकांकरिता घेऊन येत आहे. अशाच काही मराठी अनुवादित तुर्की कादंबऱ्यांच्या परिचयाची लेखमाला — 'दास्तान-ए-तुर्की' — आपण 'प्रिय रसिक'मध्ये सुरू केलेली आहे. या सर्व कांदबऱ्या विविध बाजाच्या, विषयाच्या, शैलीच्या आणि मुख्य म्हणजे वाचकांना खिळवून ठेवून खऱ्या अर्थाने वाचनानंद देणाऱ्या आहेत. या मालेतील सर्व कादंबऱ्यांचा परिचय प्रवीण कलंत्री हे एक रसिक-वाचक करून देत आहेत.

# इस्तंबूल इस्तंबूल

बुऱ्हान सोनमेझ

अनुवाद : सविता दामले

कायद्याचे शिक्षण घेण्यासाठी बुऱ्हान सोनमेझ इस्तंबूलला आले असतानाच त्यांनी मासिके व वृत्तपत्रांमध्ये लिहिण्यास सुरुवात केली होती. तत्कालीन राजकीय व्यवस्थेविरुद्ध केलेल्या लिखाणामुळे त्यांच्या जीविताला धोका निर्माण होऊन त्यांना तुर्कस्तान सोडून ब्रिटनला जाणे भाग पडले. तिथे त्यांनी तुर्की भाषेतून लेखन केले. त्यांच्या कादंबऱ्यांना अनेक राष्ट्रीय स्तरावरचे पुरस्कार मिळाले. मूळ तुर्की भाषेत लिहिलेल्या या कादंबरीचा इंग्रजीसह वेगवेगळ्या दहा भाषांमध्ये अनुवाद झालेला आहे.



ही कादंबरी केवळ राजकीय दडपशाही आणि मानवी छळाची कहाणी नाही, तर अत्यंत अंधाऱ्या कोठडीत वेदनादायी परिस्थितीतही मानवी आशावाद कसा जिवंत राहतो, याचे एक प्रभावी रूपकात्मक कथाकथन आहे. ही कादंबरी तुर्की साहित्यातील एक महत्त्वपूर्ण आणि वाचकाला विचार करण्यास लावणारी कलाकृती मानली जाते.

इस्तंबूल शहराच्या खाली असलेल्या एका भूमिगत तुरुंगाच्या कोठडीत चार राजकीय कैदी आहेत — एक डॉक्टर, डेमिरटे हा विद्यार्थी, तरुण कामू न्हावी आणि म्हातारा अंकल कुहेयलान.

त्यांचा रोज होणारा शारीरिक छळ, उपासमार, कडाक्याची थंडी आणि चहुबाजूंचा अंधार या गोष्टी त्यांच्या जगण्याला अत्यंत वेदनादायी बनवतात. कोठडीत त्यांना दिवस-रात्रीचा फरकसुद्धा समजत नाही. पहारेकरी त्यांच्यासाठी जेवण घेऊन येतात त्यावरून ते वेळेचा अंदाज लावतात. या असह्य वेदनेतून जगण्याची इच्छा जिवंत

राहावी म्हणून ते एक अनोखा मार्ग शोधतात, तो म्हणजे एकमेकांना गोष्टी सांगणे.

दहा दिवसांच्या कालावधीत हे कैदी आळीपाळीने गोष्टी सांगतात. काही भूतकाळातल्या असतात — खऱ्या, वेदनादायी — किंवा काही कल्पितही असतात. काही कल्पनेतल्या गोष्टी सत्यात उतरल्याचा आभास निर्माण करतात. इस्तंबूल शहराबद्दलच्या आठवणी, दंतकथा, रहस्यमय गोष्टी, विनोद आणि त्यांच्या अटकेपूर्वीच्या आयुष्यातील कथा ते सांगतात.

प्रत्येकाच्या कथनात दोन इस्तंबूल आहेत. एकात राजकीय दडपशाहीमुळे कैदी भीतीच्या सावटाखाली छळ सहन करत आहेत. या इस्तंबूलमध्ये वेदनेशिवाय दुसरे काहीही नाही. या दडपशाहीविरुद्ध आवाज उठवणारे निष्ठूरपणे मारले जातात.

दुसऱ्या इस्तंबूलमधे लोक मोकळेपणाने जगत आहेत. एकमेकांवर प्रेम करतात. हास्यविनोद करतात. खऱ्या

अर्थाने जीवनाचा उपभोग घेतात. चारही कैदी या गोष्टींच्या आधारावर रोज होणाऱ्या छळाच्या शारीरिक वेदना, एकात एक मिसळलेले दिवस आणि रात्र विसरून भविष्याची स्वप्ने बघतात.

समोरच्या कोठडीतच एक तरुण मुलगी अनेक अत्याचार, शारीरिक वेदना होत असतानाही हसण्याचा प्रयत्न करते. बोटाने हवेत अक्षरं काढून संवाद साधण्याचा प्रयत्न करते.

यातील काही जणांचे भूतकाळ काही प्रसंगी एकमेकांना छेदतात; तेव्हा ते परत नव्याने ओळख पटवून घेतात.

कथानकात इस्तंबूल ही फक्त पार्श्वभूमी नाही. ती व्यक्तिरेखा आहे. चार कैदी तुरुंगात असतानाही त्यांच्या कथांमधून शहर फिरत राहतं. बोस्फोरस, गलाता पूल, बेयोग्लूच्या गल्ल्या, प्रिन्स बेटं, मस्जिदी, चर्च, यहुदी दुकानं, आर्मेनियन बेकरी ही गर्दीची ठिकाणं जिवंत होतात. खिडकीतून दिसणारा आकाशाचा एक तुकडा आणि त्यातून उडणारा एक समुद्री पक्षी, एवढंच त्यांचं जग. पण कथांमधून

ते संपूर्ण शहर फिरतात. शहर त्यांना सोडत नाही आणि ते शहराला सोडत नाहीत. एका अर्थाने इस्तंबूल म्हणजे त्यांचा आत्मा असावा असेही वाटते. या ओघात अधूनमधून काही प्रतिकं, काही रूपककथा येतात. त्याच्या मुळाशी गेलं तर एका वेगळ्या संस्कृतीचा परिचय होतो.

माणूस शारीरिकदृष्ट्या कितीही जखमी असला, विकलांग झाला तरी त्याचे विचार कोणी ताब्यात घेऊ शकत नाही. त्याला कथा सांगता येतात आणि त्या कथांमधून तो स्वतंत्र राहतो. छळ करणारे त्यांचे शरीर मोडू शकतात, पण त्यांच्या कल्पनांवर-कथांवर दुसरं कोण अधिकार गाजवू शकत नाही. कारण एखादी कल्पना, एखादा विचारच केवळ अशी गोष्ट आहे जी तुरुंगाच्या भिंती ओलांडू शकते.

सविता दामले यांनी केलेला अनुवाद अप्रतिम आहे. तुर्की भाषेची काव्यात्मकता आणि क्रूरतासुद्धा त्यांनी मराठीत उत्तमरीत्या, ओघवत्या शैलीत मांडलेली आहे.

❋❋❋

# इस्तंबूल इस्तंबूल

## बुऱ्हान सोनमेझ

### अनुवाद : सविता दामले




**किंमत ₹. ३५०/-**

सोबतचा QR कोड स्कॅन करून ९८६७२४२४०७ या व्हाट्सॲप क्रमांकावर पैसे पाठवल्याचा तपशील, आणि पिनकोडसहीत संपूर्ण पत्ता पाठवून पुस्तक खरेदी करता येईल.

ऑनलाईन पुस्तक खरेदीसाठी वेबसाईट popularprakashan.com

Available on amazon.in

## सर्व विक्रेत्यांकडेही उपलब्ध !


हे मासिक संपादक, मुद्रक, प्रकाशक हर्ष भटकळ यांनी पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि. यांचेकरिता ३०१, महालक्ष्मी चेंबर्स, २२, भुलाभाई देसाई रोड, मुंबई ४०० ०२६ येथे प्रसिद्ध केले. संपादक : अस्मिता मोहिते.